**परजिवीशास्त्र विभाग,**

**नागपुर पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपुर**

प्र १. जनावरांचे अंगावर किटकनाशकाची फवारणी करण्याअगोदर कोणती काळजी घ्यावी?

उत्तर: जनावरांना थोडा चारा देवून भरपूर पाणी पाजावे जेणेकरून ती तहानलेली राहणार नाहीत. किटकनाशकाचे द्रवण जनावरांपासून दूर ठेवावे जेणेकरून ते पिता येणार नाही.

प्र २. जनावरांचे अंगावर किटकनाशक फवारल्यानंतरसुद्धा गोचिड कमी का होत नाही?

उत्तर: किटकनाशक फवारताना पॉवर स्प्रे पंपाचा वापर करावा जेणेकरून जनावराची कातडी पुर्णत: ओली झाली पाहिजे, म्हणजे गोचिड किटकनाशकाचे द्रवणाने ओले होतील व मरून पडतील किंवा किटकनाशकाचे द्रवणाने अंघोळ घालावी.

प्र ३. किटकनाशक कितीवेळा जनावराचे अंगावर फवारावे किंवा लावावे?

उत्तर: गोचिड असलेल्या जनावरांना किटकनाशक प्रत्येक सात दिवसांनी किमान ४ ते ५ वेळा लावणे गरजेचे आहे.

प्र ४. जनावरांना जंतनाशक औषधे केव्हा दिली पाहिजे?

उत्तर: जनावरांना औषधे पावसाळा सुरू होण्याअगोदर देणे गरजेचे आहे. तसेच जंतनाशक औषधे देण्याचे अगोदर त्यांचे शेणाचे नमुने प्रयोगशाळेत पाठवून तपासणी करावी.

प्र ५. गायी म्हशींचे वासरांमध्ये कोणते परजिवी आढळून येतात? त्यांचे नियंत्रणासाठी काय करावे?

उत्तर: गायी म्हशींच्या वासरांमध्ये मुख्यत्त्वे टोक्सोकॅरा व्हिटूलोरम हे गोलजंत आढळून येतात. ह्याची बाधा गरोदरपणामध्ये होते. त्याकरिता वासरू जन्मल्यानंतर १५ दिवसांनी पशुवैद्यकाच्या सल्ल्याने जंतनाशक औषधे द्यावीत.

प्र ६. शेळीचे करडू, गायी म्हशींची वासरे यांना रक्तीहागवण होवू नये यासाठी काय उपाय करावे?

उत्तर: रक्ती हागवण ही कॉक्सीडिया नावाच्या आतडांमध्ये असणाऱ्या एकपेशीय परजिवींमुळे होते. रक्तीहागवण होऊ नये यासाठी लहान वासरे व मोठी जनावरे (तसेच शेळीचे करड आणि मोठया शेळया) ह्यांना एकत्र बांधू नये. वासरांच्या खालची जागा नेहमी कोरडी व स्वच्छ असावी. प्रामुख्याने हा परजिवी रोग पावसाळयात होत असल्याने जनावरांचा गोठा कोरडा ठेवावा. हे परजिवी दुषित चाऱ्याद्वारे जनावरांच्या शरीरात प्रवेश करतात. म्हणून जनावरांचा चारा त्यांच्या शेणामुळे दुषित होवू नये ह्याची काळजी घ्यावी.

प्र ७. म्हशींमध्ये आढळणाऱ्या उवा नियंत्रणात करण्यासाठी काय उपाय करावे?

उत्तर: म्हशींमध्ये उवांचे नियंत्रण करण्यासाठी चार महिन्यातून एकदा त्यांचे कातडीवरील केस काढणे गरजेचे आहे. तसेच किटकनाशकांचे योग्य प्रमाणात द्रवण करून पॉवर स्प्रे पंपाने म्हशीचे अंगावर फवारावे. ही फवारणी दर आठवडयातून एकदा करावी. असे किमान ५ ते ६ वेळा करणे गरजेचे आहे. फवारणी करताना म्हशीची कातडी किटकनाशकाचे द्रवणाने पुर्णपणे ओली केली पाहिजे. किटकनाशके लावणे अगोदर म्हशीला थोडा चारा व पाणी देणे गरजेचे आहे.

प्र ८. बाहेरगावावरून गायी खरेदी करून आणल्यानंतर त्या आजारी पडतात. बरेच दिवस उपचार करूनही त्या तंदुरूस्त राहत नाहीत, ही लक्षणे परजिवी रोगांमध्ये असू शकतात का? असल्यास माहिती द्यावी.

उत्तर: बाहेरगावावरून विकत आणलेल्या गायी मुख्यत्वे करून जर्सी व होस्टन असतात. या जातीच्या गायींमध्ये थायलेरिओसिस नावाचा रोग झालेला आढळून आलेला आहे. या रोगामध्ये जनावरांची हालचाल सुस्तावते, डोळयातून अश्रू येतात, डोळे निस्तेज दिसतात, ताप येतो आणि जनावर चारा खाणे बंद करते.

प्र ९. थायलेरिया या रोगाचे परजिवी कोणते व हा रोग कसा प्रसार पावतो?

उत्तर: थायलेरिया ॲनुलॅटा ह्या रक्तातील एकपेशीय जंतामुळे थायलेरिओसिस नावाचा रोग होतो. हा रोग हायलोमा नावाच्या गोचिडांमार्फत एका जनावरांपासून दुसऱ्या जनावरांना होतो.

प्र १० गोचिडांपासून जनावरांना कोणते अपाय होतात?

उत्तर: गोचिड हे रक्तपिपासू असतात त्यामुळे जनावरांच्या रक्तातील लाल पेशींचे प्रमाण कमी होते, त्यालाच ॲनेमिया असे म्हणतात त्यामुळे जनावरे अशक्त होतात तसेच ते इतर रोगांनादेखील बळी पडू शकतात. गोचिडांमुळे गायी म्हशींमध्ये थायलेरिया, बॅबेसिया (लाल लघवी असणारा रोग), ॲनाप्लाज्मा, एरलीकिया ह्यासारखे रोग होवू शकतात.

प्र ११. किटकनाशकाची फवारणी करण्याव्यतिरिक्त गोचिड निर्मुलन करण्यासाठी काय उपाय करावे?

उत्तर: जनावरांचा गोठा स्वच्छ ठेवावा. गोठयामध्ये दगड, धोंडे वा काडीकचरा असू नये कारण मादी गोचिड हयादगडाखाली व पालापाचोळयाखाली अंडे देते. जनावरांचा गोठा स्वच्छ करून फ्लेमगनने (टेंभा) जाळून काढावा. असे करताना गोठयामध्ये आग लागणार नाही हयाची काळजी घ्यावी. जनावरांच्या अंगावर असणारे गोचिड काढून जाळून टाकावे.

प्र १२. गायबैलांमध्ये होणारा पिन्नस नावाचा रोग कश्यामुळे होतो?

उत्तर: पिन्नस हा रोग गायीबैलांमध्ये सिस्टोसोमा नेसॅली नावाच्या चापटकृमीमुळे होतो. हे परजिवी नाकातील रक्तवाहिन्यांमध्ये असतात. मुख्यत: विदर्भामध्ये भंडारा, गोंदिया, गडचिरोली हया जिल्हयांमध्ये हया रोगाची लागण जास्त आढळून येते.

प्र १३. पिन्नस रोगाची लक्षणे कुठली?

उत्तर: नाकामध्ये मांसल वाढ होणे, त्यामुळे श्वसनाला त्रास होणे, जनावंराच्या जवळ उभे राहिल्यास घोरण्याचा आवाज स्पष्ट ऐकू येतो. श्वसनाला त्रास असल्यामुळे बैलांची काम करण्याची शक्ती कमी होते व गायींमध्ये दुधाचे प्रमाण कमी होते. जनावरांची वाढ खुंटते.

प्र १४. सिस्टोसोमा नेसॅली (पिन्नस) चा प्रसार कसा होतो?

उत्तर: तळयांमधील गोगलगायी (एन्डोप्लेनॉरबिस एक्सूटस) मध्ये हया परजिवींचे जंतू तयार होतात व पाण्यामध्ये बाहेर येतात. जनावरे पाणी पिण्यासाठी तळयामध्ये गेल्यास कातडीवाटे हे जंतू शरीरात प्रवेश करतात व नाकपूडीच्या रक्तवाहिन्यांमध्ये त्यांची वाढ होते.

प्र १५. डुकराचे मांस खाल्ल्यामुळे माणसाला कोणते परजिवी रोग होवू शकतात?

उत्तर: डुकराचे अर्धवट शिजलेले मांस खाल्ल्यामुळे टेनिया सोलियम नावाचा चापटकृमी माणसाच्या लहान आतडयांमध्ये तयार होतो. या चापटकृमीची अंडी माणसाच्या विष्टेद्वारे बाहेर पडतात. अशी अंडी दुषित अन्न व पाण्याद्वारे दुसऱ्या माणसाच्या शरीरात गेल्यास सिस्टीसरकस सेल्यूलोसी नावाचे गोल आकाराचे सिस्ट तयार होतात. हे सिस्ट माणसाच्या यकृत आणि मांसपेशींमध्ये आढळून येतात. बऱ्याचदा हया सिस्ट माणसाच्या मेंदुमध्ये किंवा पाठीच्या कण्यामध्येसुद्धा आढळून येतात. त्यामुळे चक्कर येते. हया रोगाला न्यूरोसिस्टीसारकोसिस असेही म्हणतात.

प्र १६. शेळयामेंढयांमध्ये गळयाच्या खालील भागात सूज येणे, पोटाचा आकार वाढणे, कातडी राठ होणे अशी लक्षणे कोणत्या परजिवी रोगामध्ये आढळून येतात?

उत्तर: शेळयामेंढयांमध्ये गळयाच्या खालील भागात सूज येणे, पोटाचा आकार वाढणे, पोटाला हलके दाबल्यास यातना होणे, हगवण लागणे ही लक्षणे फॅसिओलियासिस या यकृतकृमीमु ळे व हिमॉकस या गोलकृमीचा बाधा झाल्यास दिसून येतात. फॅसिओलियासिस हा रोग फॅसिओला जायगॅटिका या चापटकृमीमुळे होतो. हे शेळयामेंढयांच्या यकृतामध्ये आढळून येतात तर हिमॉकस हे पोटामध्ये आढळून येतात.

प्र १७. शेळयामेंढयांमध्ये यकृतकृमी होण्यामागे कोणते कारण आहे?

उत्तर: यकृतकृमीचे जंतू गोगलगायीच्या पोटात तयार होतात. असे जंतू गोगलगायीच्या शरीराच्या बाहेर पडून गवतावर आढळून येतात. असे गवत शेळयामेंढयांनी खाल्ल्यास त्यांना यकृतकृमीची बाधा होते.

प्र १८ यकृतकृमीचे नियंत्रण कसे करावे?

उत्तर: यकृतकृमीचे नियंत्रणासाठी शेळयामेंढयांना तलावातील पाणी पिवू देऊ नये तसेच त्यांना तलावाच्या आजूबाजूला चरू न देता उंच जागेवर चरावयास न्यावे. त्यांना विहीरीचे किंवा बोअरवेलचे पाणी पाजावे.

प्र १९. जनावरांना आंतर व बाहय परजिवीची बाधा होवू नये ह्यासाठी काय करावे?

उत्तर: जनावरांची योग्य निगा व देखरेख न केल्यास परजिवी रोगाचे संक्रमण होते. असे परजिवी रोग होवू नये म्हणून जनावरांचा गोठा स्वच्छ व कोरडा असावा. गोठयाच्या आजूबाजूला पाण्याची डबकी साचू देवू नये. गोठयामधील शेण उचलून दूरवर त्याचा ढिग करावा. पालापाचोळा, काडीकचरा जाळून टाकावा. गोबरगॅसमध्ये शेणाचा उपयोग केल्यास आंतरपरजिवी चारा दुषित करू शकत नाही.

प्र २० जंतनाशक औषधे कितीवेळा द्यावीत ह्याबद्दल मार्गदर्शन करावे.

उत्तर: जंतनाशक औषधे नेहमी पशूवैद्यकाच्या सल्ल्याने द्यावीत. जंतनाशक औषधे देण्याआधी त्यांच्या शेणाचे नमुने प्रयोगशाळेत पाठवून तपासणे गरजेचे आहे.